पनवेल (प्रतिनिधी) प्रकल्पग्रस्त रिक्षा चालकांनी आपल्या उदरनिर्वाहासाठी स्थापन केलेल्या प्रकल्पग्रस्त बेरोजगार वाहन चालक मालक कल्याणकारी संस्था या चार चाकी रिक्षाचालकांच्या संघटनेने निर्मित केलेले संघटनेचे स्टिकर आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी मॅक्सिमो रिक्षांना लावण्यात आले.

कोकण मॅक्सिमो चालक मालक वेल्फेर असोसिएशन संलग्न प्रकल्पग्रस्त बेरोजगार वाहन चालक मालक कल्याणकारी संस्थामधील रिक्षाचालक पनवेल-उरण असा मार्गकमावर आपला धंदा करीत आहे. या रिक्षा चालकांनी आमदार प्रशांत ठाकूर, कामगार नेते शाम म्हात्रे, नगराध्यक्षा चारूशिला घरत, उपनगराध्यक्ष मदन कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्पग्रस्त बेरोजगार वाहन चालक मालक कल्याणकारी संस्थेची स्थापना केली असून संघटनेची माहिती असलेले स्टिकर आज रिक्षांना लावण्यात आले.

यावेळी नगराध्यक्षा चारूशिला घरत, उपनगराध्यक्ष मदन कोळी, पंचायत समिती सदस्य निलेश पाटील, काळुंद्रे विभागीय अनेष ढवळे संघटनेचे अध्यक्ष नेहरू दिघोडकर, उपाध्यक्ष रोहिदास गोंधळी, सचिव पदमाकर पाटील, खजिनदार सुभाष नाईक, सहखजिनदार निलेश म्हात्रे, सदस्य दयानंद घरत, गजानन भोईर, अंकुश पाटील, त्रिशुल दिघोडकर, कैलास पाटील, आतिश म्हात्रे, सावळाराम पाटील, गणेश पाटील, राजेंद्र घरत, अतिश गायकवाड, दत्ता पवार, हिरामण पाटील, संतोष पाटील, दिलीप मुंडकर, दिलीप मढवी, संजीवन म्हात्रे, सुरेश देडे, पांडुरंग हातमोडे, रूपेश पाटील, रमेश भोईर आदी रिक्षाचालक सदस्य उपस्थित होते.